# चक्रांकित

ढगाळलेलं आकाश, आषाढातल्या झडीची अखंड रिपरिप.

अर्धउजेडाची दुपार अन् ओलसर थंड वारा. कुंद वातावरण.

दुपारच्या झोपेतून परूळेकर जागे झाले अन् पुन्हा त्यांच्या मनाला त्या विचित्र अस्वस्थतेनं घेरलं. गेल्या काही दिवसांपासून त्यांच्या मनात एक विचित्र भावना, रितेपणाची, हरवल्यासारखं वाटणारी, उदासिनतामिश्रित अशी घर करून राहिली होती. वाताचा झटका येऊन गेल्यावर जसा एकप्रकारचा अशक्तपणा शरीराला नि मनाला जाणवतो तसं अगदी गळून गेल्यासारखं वाटत होतं. कशात काही अर्थ नसल्यासारखं. तोंडावरून पाण्याचा हात फिरवून त्यांनी आकाशाकडे पाहिलं. आकाश अगदी गच्च भरून आलं होतं अन् त्याला एकसारखी गळती लागली होती. त्यांच्या मनावरचं सावट अधिकच दाट झाल्याचं त्यांना जाणवलं.

गार वाऱ्याच्या झुळुकीसरशी त्यांनी शाल अंगाभोवती अधिकच घट्ट लपेटली आणि ते आरामखुर्चीत येऊन बसले. सवयीनं त्यांचा हात खिशातील पाकिटाकडे गेला आणि ते सिगरेट ओढू लागले. नजरेसमोर तरळणाऱ्या धुराच्या वलयांकडे अर्धमिटल्या डोळ्यांनी बघत त्यांनी त्या विशिष्ट भावनेचा मागोवा घेण्यास नकळत सुरुवात केली –

"कधीपासून बरं आपल्याला असं वाटतंय ?" आणि तर्काचा काटा फिरता फिरता शेवटी एका बिंदूवर स्थिर झाला – शालनचं लग्न !

काही दिवसांपूर्वी आपण तिच्या लग्न समारंभानंतर घरी परत आलो तो ही मनाची विचित्र अवस्था घेऊनच ! ते अधिक विचार करू लागले अन् चमकले. आपल्या मनात आलेल्या त्या विचारांची त्यांची त्यांनाच भिती वाटली अन् चोरट्या नजरेनं त्यांनी भोवताली पाहिलं. मग एक नवीन सिगरेट पेटवीत ते मनाशीच म्हणाले –

"पण तिचा नि आपला असा संबंधच कोणता होता ?"

शालन आराधे ही आपल्या 'नाट्यवैभव' ह्या हौशी नाटकसंस्थेची एकमेव प्रमुख नायिका अन् आपण त्याच संस्थेचे एकमेव नाटककार नि दिग्दर्शक!

परूळेकरांनी सिगारेटच्या जळत्या टोकावर साचलेली राख चुटकीनं झाडली अन् तसाच हा विचारही मनातून काढून टाकला. एक जोराचा झुरका ओढून धुराचा एक मोठ्ठा भपकारा त्यांनी हवेत सोडला. त्याकडे पहात असतानाच

त्यांना आठवलं –

"लहानपणापासूनच आपण नाटकवेडे. नाटकं बघण्याचा, वाचण्याचा तशीच ती स्वतः लिहून बसविण्याचा आपल्याला त्या वयापासूनच जबरदस्त नाद. गणपतीच्या मेळ्यातील नाटकापासून सुरुवात करून हळूहळू आपण मोठी नाटकं लिहू व बसवू लागलो. 'नाट्यवैभव' ह्या आपल्या हौशी नाट्यसंस्थेची स्थापनाही आपण मोठ्या उमेदीत केली. एक दिवस संपूर्ण महाराष्ट्राला आपण आपल्या नाटकांनी वेडं करू अशी महत्त्वाकांक्षा मनात बाळगून आपण ह्या संस्थेत अतोनात परिश्रम करू लागलो. आशानिराशेचे चटके सोसत आपण यशाच्या पायऱ्या चढत गेलो. अन् शेवटी 'मध्यान्हीचा सूर्य' ह्या आपल्या नाटकानं आपली आकांक्षा पूर्ण केली. आज साऱ्या महाराष्ट्रात एक उत्तम प्रतीचा नाटककार अन् दिग्दर्शक म्हणून सतत आपलं नाव गाजतं आहे."

तृप्तीनं भरलेला त्यांच्या मनाचा फुगा हेलकावे खात हळूहळू वर चढू लागला तोच त्याला एका विचारानं टोचलं, "पण हे यश निर्भेळ आपलंच का ? सुनंदाचा ह्यात काहीच का वाटा नाही ? निदान मदत ?"

परूळेकर उठले अन् खोलीत फेऱ्या मारू लागले.

"हे मात्र खरं हं," त्यांनी कबुली दिली ! "सुनंदेच्या रूपानं अभिनयनिपुण नायिका आपल्याला त्यावेळी लाभली म्हणूनच आपण आज इथपर्यंत पोहचलो. तिच्या गुणांवर लुब्ध होऊनच आपण नायिकाप्रधान नाटकं लिहिली अन् तिच्या अभिनयाला वाव दिला. आपल्या कित्येक सत्कारसमारंभात आपण तिचं ऋण मान्य केलं आहे."

नकळत परूळेकर भूतकाळात शिरले. त्यांच्या फेऱ्या थांबल्या अन् ते खिडकीशी उभे राहिले. मनावरील ते सावट क्षणभर दूर झाल्यासारखं त्यांना वाटलं.

"नाटकाच्या तालमी, ती रात्ररात्र जागरण, त्या चर्चा, ते काव्यशास्त्रविनोदाचं खेळीमेळीचं वातावरण अन् त्या सहली ह्यातून सुनंदाचा नि आपला सहवास वाढत गेला. तिचा सुडौल बांधा, केतकीसारखा गौर वर्ण, अतिशय आकर्षक अन् बोलका चेहरा आणि विशेषतः त्या टपोऱ्या डोळ्यातून नेहमी व्यक्त होणारी आपल्या कलागुणांवर मोहून गेलेली तिची ती भावना ह्यांनी आपण तिच्याकडे आकर्षित झालो अन् नकळत तिच्यावर प्रेम करू लागलो."

दुपार मावळतीकडे झुकली असावी, कारण दिवसाचा प्रकाश अधिकच काळवंडला. पावसानं मध्येच जोरानं, कोसळण्यास सुरूवात केली. कौलांवर,

झाडांवर, जमिनीवर धारांच्या माऱ्यानं होणाऱ्या लयबद्ध गंभीर नादानं आसमंत भरून गेला. दूर कुठंतरी लागलेल्या रेडिओवरील 'विविधभारतीचे' स्वर त्यात अस्पष्ट मिसळल्यासारखे झाले. परूळेकरांच्या मनावरही त्या नादाची झिंग चढल्यासारखी झाली असावी. पर्जन्याच्या तालावर विवाहानंतरच्या एका अवर्णनीय बेहोषीत काढलेल्या काळाच्या आठवणींनी त्यांच्या मनात नर्तन करण्यास सुरुवात केली.

लग्नानंतर तर त्यांच्या प्रतिभेला विशेषच बहर आला होता. त्यांच्या गुणाचं चीज सरकारदरबारीही झालं होतं. लोकप्रियता तर आधीच मिळाली होती. यशाचा कैफ त्यांना व सुनंदेला असा काही चढला होता की त्यात पहिली पाचसहा वर्षे कशी लोटली हे दोघांनाही कळलं नव्हतं. यशाच्या नशेत अन् सुनंदाच्या अनिवार प्रेमात ते अगदी तृप्त होते. त्यांच्या जीवनाचा पेला सुखानं काठोकाठ भरून वाहू लागला होता –

अंगावर आलेल्या पावसाच्या एका तुषारानं परूळेकर क्षणभर वर्तमानकाळात आले, पावसाचा जोर किंचित कमी झाला होता. वातावरण थोडं उजळलं होतं. खिडकीपासून दूर होत ते परत फेऱ्या मारू लागले.

"अरविंद झाला अन् नंतर सुनंदाला नाटकात काम करणे व्यवस्थितपणे जमेना. तिनं नाटकात काम करणं हळूहळू कमी केलं. त्याच्या पाठीवर झालेल्या वर्षेनं तर तिला त्या सृष्टीतून कायमचं निवृत्त केलं. अन् नवल असं की, झालेल्या त्या बदलात तिनं पूर्णपणे जमवून घेतलं. आपण लिहिलेल्या अन् बसविलेल्या नाटकाचं एका जाणकार रसिकाच्या भूमिकेतून परीक्षण करण्यात अन् अरविंद, वर्षेच्या कोडकौतुकानं भरलेल्या आपल्या संसारात ती पूर्णपणे रमून गेली. इतकी रमून गेली, की जितकी ती रंगभूमीवर भूमिका वठविताना रमून जायची.

फेऱ्या मारतामारता परूळेकर सहजच आपल्या लिहिण्याच्या टेबलजवळ आले. सुनंदानं भरलेल्या टेबलक्लॉथवर ठेवलेल्या फ्लॉवरपॉटकडे अन् त्याजवळच ठेवलेल्या, लग्नानंतर जोडीनं काढलेल्या फोटोकडे त्याचं लक्ष गेलं. फोटोतील आपल्या प्रतिमेकडे निरखून पाहून मग ते समोरील आरशासमोर उभे राहिले. आपल्या चेहऱ्यात व शरीराच्या ठेवणीत बराच फरक झालेला त्यांना जाणवला. गाल वर आले होते अन् कपाळावरच्या बाजूंची दोन्ही टोकं जरा वर आत गेली होती. कपाळावर अलीकडे एक रेषा उमटू लागली होती. दोन्ही कानांजवळच्या केसात रूपेरी छटा तुरळक चमकू लागली होती. सुखासीन स्वस्थ जीवनाच

प्रतिबिंब त्यांच्या किंचित स्थूलपणाकडे झुकलेल्या देहामध्ये पडलं होतं. पण डोळ्यांखाली अलीकडे काळसर वलयं उमटू लागली होती.

"आजच्याइतका हा बदल आपल्याला पूर्वी कधीच जाणवला नव्हता. इतकं निरखून आपण स्वत:कडे पाहिलंच कधी म्हणा ! सुनंदा आपल्या संसारात रमली तसंच आपणही आपल्या 'नाट्यवैभवा'च्या संसारात दंग झालो. सुनंदाची जागा हळूहळू शालननं घेतली.

शालन निश्चित कधीपासून आपल्या संस्थेत काम करू लागली हे काही त्यांना नीटसं आठवलं नाही. सुनंदा असताना कदाचित दुय्यम भूमिका वगैरे करीत असेल, पण सुनंदा निवृत्त झाल्यानंतर तिनं प्रमुख भूमिका पार पाडण्याची जबाबदारी उचलली अन् इतक्या थोड्या अवधीत ती रंगभूमीवर चमकू लागली की सर्वांना तिनं आश्चर्यात टाकलं –

"शालन प्रमुख नायिका असल्याशिवाय आपल्याला आपली नाटकं बसवणंसुद्धा अशक्य वाटावं एवढे स्थान तिनं आपल्या हृदयात पटकावलं. खरं म्हणजे सुनंदाला पुढं आणण्याकरता आपल्याला विशेष श्रम करावे लागले नाहीत. तसंच शालनच्या बाबतीतही झालं. पण जसजशी ती लोकप्रिय होऊ लागली तसे तसे तिला पुढं आणायचं श्रेय लोक आपल्यालाच देऊ लागले. सदैव नवनवीन शिकण्याच्या तिच्या तयारीनं आणि जबरदस्त आत्मविश्वासानं शालननं आपलं हे स्थान मिळवलं होतं. पण ती वेडीही लोकांप्रमाणेच समजत होती. आपल्यालाच श्रेय देत होती –

आरशातील त्यांच्या प्रतिबिंबाच्या चेहऱ्यावर एक अस्पष्ट स्मितरेषा झळकून गेली. परूळेकर आरशापुढून दूर झाले अन् आरामखुर्चीत विसावले. एवढ्यात घड्याळात चारचे ठोके पडले.

खोलीचं दार वाजलं तसं त्यांनी दाराकडं पाहिलं. चहाचा ट्रे घेऊन सुनंदा दारातून येत होती. ट्रे समोरच्या स्टुलावर ठेवून किटलीतील गरम चहा तिनं कपात ओतला. परूळेकरांनी आपल्या आवडीनं त्यात दूध व साखर टाकली अन् चमच्याचं ढवळू लागले तशी सुनंदा म्हणाली,

"काय बाई पावसानं सकाळपासनं धार धरलीय नुसती ! अरविंद, वर्षा आज शाळेतून येताना चिंब ओले होणार."

"अं ?.... हो ना !" परूळेकरांनी कप ओठांना लावला व ते चहाचा गरमगरम घोट घेऊ लागले. खिडकीतून दृष्टिपथात येणाऱ्या रस्त्याच्या तुकड्याकडे त्यांची नजर सहज वळली. एक जोडपे त्यांना एकाच छत्रीत अर्धवट भिजत

जाताना दिसलं.

आपण नि शालन असंच एकदा फिरायला गेलो होतो. उन्हाळ्याचे सरते दिवस होते ते. मृग नुकताच लागला होता. त्याच्या एकदोन सरी तोपर्यंत कोसळून गेल्या होत्या. नुकत्याच लिहिलेल्या 'मोह' या नाटकाची चर्चा करण्याच्या रंगात आपण शहरापासून बरेच दूर आलो होतो. वर आकाश काळवंडलं अन् विजेचे लवलवणं सुरू झालं तरी आपल्या दोघांचेही तिकडे लक्ष गेलं नव्हतं... आणि एकदम कडाडत सर कोसळली तेव्हा एका क्षणात आपण दोघंही ओलेचिंब झालो. तसंच धावतपळत जवळच्या झाडाचा आश्रय घेतला न घेतला तोच काडकन् कुठंतरी वीज कोसळली नि आत्यांतिक भयानं शालननं आपल्या गळ्याला मिठीच मारली. ओल्या स्त्रीदेहाच्या त्या अननुभूत स्पर्शानं आपल्या अंगावर त्यावेळी रोमांच उठले.

परूळेकर एकदम दचकले. त्यांच्या हातातली कपबशी थरथरली. मघाशीच दडपून टाकलेल्या कल्पनेनं पुन्हा जोरानं डोकं वर काढलं. आपलं शालनवर प्रेम तर बसलं नसेल ?

आपल्या मनातील अस्वस्थेचं हे कारण त्यांना थोडफार जसं पटू लागलं तसं त्यांनी हळूच सुनंदाकडे पाहिलं. ती मघाच आत निघून गेली होती. त्यांना हायसं वाटलं – पण क्षणभरच.

दुसऱ्या क्षणीच त्यांच्या मनात त्या शंकेनं वादळ उठविण्यास सुरुवात केली. उलटसुलट विचारांच्या द्वंद्वात ते अडकले अन् त्या आवेगात आरामखुर्चीतून उठून ते खोलीत जोरजोरात फेऱ्या घालू लागले.

'आपलं शालनवर प्रेम बसलं असेल का ? आपल्याला शालनची आसक्ती वाटते का ? असं असेल तर सुनंदेवरचं आपलं प्रेम ओसरलं म्हणायचं?.... मग इतके दिवस आपल्याला ते कसं जाणवलं नाही ?..... आपण कोणत्या धुंदीत होतो ?.... शालनचा मोह ?.... तेच ! तेच असावं. तेव्हाच तिचा विवाह झाला अन् आपल्या मनात काहीतरी हिरावून नेल्याची, एकटेपणाची, रितेपणाची भावना अंकुरली.... तिनं मूळ धरलं.....

जसजसा ते अधिक विचार करू लागले तसतशी त्यांची खात्रीच होऊ लागली. त्यांचा चेहरा अपराधी दिसू लागला. त्यांचा थरथरता हात सवयीनं खिशात सिगरेटच्या पाकिटाकडे गेला. पण ते रिकामं पाहून त्यांनी ते तसंच खिडकीबाहेर फेकून दिलं.

त्यांच्या मनाची अगदी केविलवाणी स्थिती झाली. धड त्यांना एका जागी बसवेना; धड उभं राहता येईना. सिगरेटची तल्लफ जशी अनिवार झाली तशी अंगावरची शाल त्यांनी घट्ट लपेटून घेतली अन् छत्री घेऊन सिगरेटचं पाकिट आणण्यास ते जवळच्या चौकावर निघाले.

ते चौकावर पोचले तेव्हा पाऊस हळूहळू कमी होत पूर्णपणे थांबला होता. शाळा सुटल्या होत्या. अन् पावसानं अडकलेल्या मुलांचे घोळके रस्त्यावरून साचलेलं पाणी पायानं उडवीत पण घाईने घरी परतत होते. पश्चिम दिशेला ढगात किंचित फट पडली होती अन् त्यातून संध्यासमयाचा तांबूस प्रकाशाचा मळकट पट्टा काळ्या फळ्यावर तांबडा फराटा ओढावा तसा दिसत होता. रस्त्यावरचे ट्यूबलाईट पेटले होते. अन् ओलसर प्रकाश फेकू लागले होते. झाडांवरून, इमारतींच्या छपरांवरून, विजेच्या तारांवरून ठिबकणाऱ्या पाण्याच्या थेंबाच्या आवाजानं वातावरण भरून राहिलं होतं. भिजट रस्त्यावर तुरळक वर्दळ सुरू झाली होती.

भोवतालच्या वातावरणाचा परूळेकरांच्या मनावर थोडासा बरा परिणाम झाला. त्यांनी दुकानातून पाकिट घेलं अन् सिगरेट काढून शिलगावली. तिचा एक कसून झुरका घेऊन ते स्वत:शीच म्हणाले –

"छे. छे ! काय भलतीच शंका आपल्याला त्रास देते आहे ! आपल्याला शालनबद्दल प्रेम, शारीरिक आसक्ती वाटली असती तर ती पुरी करणं आपल्याला कठीण का होतं ? तालमी चालू असताना होणारा निकट स्पर्श, सहलीत सहज मिळालेला एकांत अन् ती आसक्त तरुणी, पण तसा विचार आपल्या मनात आला नाही. एका प्रयोगाच्या रात्री शालनला काही महत्त्वाच्या सूचना देण्यासाठी आपण घाईघाईने तिच्या मेकअप् रूमध्ये शिरलो अन् बेसावध शालन आपल्याला अपुऱ्या वस्त्रात दिसली. पण आपल्या मनाला विकारांचा चुकूनही स्पर्श झाला नाही. बरं ! लोकलज्जा म्हणावं तर तसं काही नसतानाच लोक आपल्या दोघांबद्दल नानाप्रकारच्या अफवा उठवीत होतेच. पण आपलं कलावंत मन त्यांना बेदरकारपणे तोंड देत होतं. अन् सुनंदाचाही आपल्यावर पूर्ण विश्वास होता. छे: छे: !

मनावरचं एक मोठं दडपण उतरल्यासारखं त्यांना वाटलं. सिगरेटचा एक खूप खोल झुरका त्यांनी घेतला अन् धुराचा भपकारा सोडला.

शेवाळानं माखलेल्या पाण्याच्या पृष्ठभागावर भलामोठा धोंडा पडताच ते विहिरीच्या कडेकडेशी जमतं अन् काही वेळानं पुन्हा पूर्ववत् पाण्याला झाकून

टाकतं. परूळेकरांच्या मनाला पूर्वीच्याच भावनेनं परत तसंच झाकून टाकलं. पण त्यांनी आता मन पक्कं केलं आणि विचार करणंच सोडून दिलं. रस्त्यावरील वाहतुकीवर निर्हेतुक नजर फिरवीत ते रमतगमत चालू लागले अन् –

तोच त्यांना शालन दिसली.

शालन अन् तिचा नवरा दोघेही हातात बंद छत्र्या घेऊन त्यांच्याकडेच येत होती. त्यांचं लक्ष जाण्यापूर्वीच कदाचित त्यांनी परूळेकरांना पाहिलं असावं. शालन लग्नात घेतलेली एक कोरी साडी नेसली होती. बिनबाह्यांचं पोलकं, उघड्या गळ्यातलं मंगळसूत्र, केसांच्या आधुनिक पद्धतीच्या भरदार आंबाड्यावर माळलेली मोगऱ्याची फुलांची वेणी, उंच टाचेचे सँडल्स – नववधू म्हणून ती सहज ओळखू येत होती. तिच्या नवऱ्यानं टेरेलिनचा सूट अन् पायात पावसाळी रबरी बूट घातले होते. केसांना पोमेड लावून वळणदार भांग काढला होता. “सोनेरी फ्रेमचा चष्मा तसा खुलून दिसतो बेट्याला !” परूळेकर स्वतःशीच पुटपुटले अन् त्या दोघांनी जोडीनं केलेल्या नमस्कारांवर त्यांनी प्रतिनमस्कार केला.

शालन नेहमीच्या उत्साहानं परूळेकरांची आपल्या नवऱ्याला ओळख करून देऊ लागली. तसा “वा ! वा ! यांना कोण ओळखत नाही ? आपल्या लग्नाला आले होते की ते !” असं काहीसं आदरानं त्यानं म्हटलेलं त्यांनी ऐकलं. आणि तिकडे लक्ष न देता शालननं आपलं गुणवर्णन त्याच उत्साहात चालूच ठेवलं.

परूळेकर पहात होते. पूर्वी शालन ज्या उत्साहानं त्यांच्याशी बोलत असे त्याच उत्सहानं ती आताही बोलत होती. तसाच चिवचिवाट करीत होती, तशीच माना वेळावीत होती. मोठमोठाले डोळे करून बोलत होती. हसत होती. त्यांच्याबद्दलचा तोच आदार तिच्या डोळ्यातून ओसंडत होता. बोलण्यातील कौतुकाची, आदराची, श्रेय देण्याची तीच भावना व्यक्त करीत होती. तिचा नवराही मोठ्या कुतूहलानं, नवलाईनं हे सगळं ऐकत होता. मधूनमधून “असं का ! वा ! वा !!” असे उद्गार काढत होता. आणि--

तरीही काहीतरी उणीव होती –

शालनच्या सहवासात पूर्वी आपल्याला चढणारी एक वेगळीच धुंदी आज चढत नव्हती. एक वेगळाच अनिर्वचनीय आनंद मनात उत्पन्न होत नव्हता. उलट मनाची ती आधीची व्यथा आणखी गहिरी होत होती. ठणकत होती....

– अन् त्यांना कारण सापडलं, अगदी अचानक, अनपेक्षित.

रंगात आलेल्या शालनची गाडी जेव्हा आपल्या नवऱ्यानं गाजवलेल्या त्याच्या क्षेत्रातील कर्तबगारीच्या वर्णनावर वळली तेव्हा त्याच्याकडे मधून मधून नजर टाकताना तीत चमकणारा तो विशिष्ट भाव, अत्यादराचा भाव, अत्यादराचा पण निव्वळ भक्तीचा नव्हे तर मोहून गेल्याचा; जो नवविवाहितेच्या डोळ्यात आपल्या पतीबद्दल दिसतो – जे प्रेयसीच्या डोळ्यात पाहून प्रियकराचं भान हरपतं; त्यांना दिसला नि ते चमकले.

त्याचं मन ओरडून उठलं –

''हाच ! हाच तो भाव की ज्याच्या प्राशनानं तुझं कलावंत मन बेहोष होत असे. धुंद होत असे. हीच ! हीच ती नजर की जी तुझ्या प्रतिभेला नवे नवे उन्मेष आणीत असते ! हाच भाव ! जो प्रथम तुला सुनंदाच्या अन् नंतर शालनच्या नयनातून मिळाला. हीच छटा ! की जी कर्तबगार व्यक्तींबद्दल तरुणींच्या डोळ्यात विलसते, अन् जिचा विषय आपण होण्यासाठी माणसं वाटेल ते महान कृत्य करण्यास मागेपुढे पाहत नाहीत. हीच ! हीच ती जादू ! की जी केवळ स्त्रीच करू शकते. कलावंतांची मनं ह्याच पाण्याने फुलतात अन् त्यांच्या प्रतिभेला बहर येतो. ह्याच ! मोत्यांच्या चाऱ्यावर कलावंताचा हंस आपल्या मानससरोवरात डौलात स्वैर विहार करत असतो –

ह्याच ! ह्याच नशेची तुला भूक जडली आहे. सवय झाली आहे. अशी सवय जशी अट्टल मद्यप्याला जडते. कितीही दारू घेतली तरी त्याला ती चढत नाही. पण न घेतली तर मन तरी अस्वस्थ होतं, अंगात ताप चढावा अन् शरीरात प्राण उरू नये असं वाटतं. जगणं भार होतं, असह्य होतं.

प्यायला दारू हवी असते. बाटली नवी असो वा जुनी. पण दारूच हवी असते.

मग ती मिळविण्याची धडपड..... लाचार उपभोग.... थोड्या वेळाची स्वस्थता.... अन् मग नशेनंतरची अस्वस्थता, आगतिकता, भकास शून्यता.... परत जिवाची घालमेल, आकांत, निरुपाय अन् पुन्हा ती दारू मिळविण्याची धडपड.....

परूळेकरांना वाटलं, की एक मोठ्ठं दुष्टचक्र गरगर फिरत आहे. अन् त्यात आपण सापडलो आहोत. त्यांचा गळा आवळून आला अन् त्यांना घेरी आली.

---